# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेसनोट** दिनांक ०६/०१/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी कल्याण मटका नावाचा जुगार खेळणाऱ्या इसमांवर कारवाई केलेबाबत ”**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक ०५/०१/२०२१ रोजी वाकड पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी बंदिस्त जागेत तसेच चिंचवड पोलीस स्टेशन हद्दीत उघड्या जागेत स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी कल्याण मटका नावाचा जुगार खेळणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०५/०१/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी वाकड पोलीस स्टेशन हद्दीत मुकेश परशुराम कस्पटे हा त्याचे वडीलोपार्जीत घरातील रुम नंबर ५ मध्ये कस्पटे वस्ती, छत्रपती चौक, येथील शिवदुर्गा गणेश मंदिराजवळ, वाकड, पुणे हा स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी लोकांकडून पैसे घेवुन त्यांना आकडे लिहून देऊन स्वतः कल्याण मटका नावाचा जुगारासाठी लोकांकडून पैसे घेवुन त्यांना आकडे लिहून देवुन स्वतः कल्याण जुगार चालवित आहे. अशी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी वाकड पोलीस स्टेशन हद्दीत १६:४५ वा चे सुमारास छापा टाकुन एकुण खालील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळुन आला त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

१) २१,३००/- रु रोख रक्कम
२) ६०/- रु किं चे कल्याण मटका जुगार खेळण्याचे साहित्य.
३) ५०,५००/- रु किं चे ०३ ॲण्ड्रॉईड मोबाईल जु.वा.किं.अं.
--------------------------------

**असा एकुण ७१,८६०/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) सतीश बळीराम वाघमारे वय ३८ वर्षे रा. गजानन कॉलनी रहाटणी पुणे (मटका रायटर) २) टारझन रतन पाचारणे वय ५६ वर्षे रा. कुऱ्हाडे यांचे भाडयाचे रुममध्ये आदर्शनगर, काळेवाडी पुणे. (मटका रायटर) ३) दिलीप गुलाब कांबळे वय ५२ वर्षे रा. मनपा शाळेमागे, वाकड गावठाण वाकड पुणे. (मटका खेळी) ४) प्रकाश लहु लांडगे वय ३२ वर्षे रा. गल्ली नंबर १, जय मल्हार कॉलनी, रहाटणी पुणे (मटका खेळी) ५) लक्ष्मण पपन गायकवाड वय ३८ वर्षे रा. खंडु कोकणे चाळ, रामनगर, रहाटणी पुणे (मटका खेळी) ६) युवराज बळीराम राजेगावकर वय ५० वर्षे रा. धनगरबाबा मंदिरामागे, कैलासनगर, काळेवाडी पुणे (मटका खेळी) ७) तात्याराव हरिचंद्र पवार वय ३२ वर्षे रा. काळेवाडी फाटा, थेरगांव पुणे (मटका खेळी) ८) मनोज महादेव विजयकर वय ३६ वर्षे रा. विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, काळेवाडी पुणे. (मटका खेळी) ९) विशाल बाबुराव वायदंडे वय ४६ वर्षे रा. जगताप डेअरी साई चौक, गुरुकृपा हौसिंग सोसा, पिंपळे निलख पुणे. (मटका खेळी) १०) राम गोविंद सुर्यवंशी वय ५५ वर्षे रा. मयुर कलाटे, ऑफिस समोर, सुदर्शन कॉलनी, वाकड पुणे (मटका खेळी) ११) धनाजी रावसाहेब बोलसुरे वय ३५ वर्षे रा. सध्या सोळानंबर थेरगांव पुणे मुळपत्ताः- मु.पो.सिंदखेड ता. निलंगा जि. लातुर (मटका खेळी) १२) विश्वास हरिभाऊ मोटे वय ४२ वर्षे रा. अभिषेक सोसायटी शाहुनगर चिंचवड पुणे

(मटका खेळी) १३) काळुराम रघुनाथ लोंढे वय ४३ वर्षे रा. पवनानगर, काळेवाडी पुणे (मटका खेळी) १४) मधुकर पांडुरंग गायकवाड वय ४० वर्षे रा. कस्पटे वस्ती, वाकड पुणे (मटका खेळी) १५) मनोहर भिमअण्णा भेलकरे वय ४५ वर्षे रा. सज्जनगड कॉलनी, रहाटणी पुणे (मटका खेळी) १६) राजु देवेंद्र मानकरे वय ३४ वर्षे रा. ड्रायव्हर कॉलनी, काळेवाडी पुणे (मटका खेळी) १७) मानकेश्वर अण्णाप्पा गवंडी वय ४८ वर्षे रा. कैलास नगर, गल्ली नंबर ३, थेरगांव पुणे. (मटका खेळी) १८) सुर्यकांत शरणाप्पा पुजारी वय ६२ वर्षे रा. संतोषनगर, संतोषकार्यालयामागे, थेरगांव पुणे (मटका खेळी) तसेच पाहिजे आरोपी नामे १९) मुकेश परशुराम कस्पटे वय ४३ वर्षे रा. शिवदुर्गा गणेश मंदिराजवळ, कस्पटे वस्ती, छत्रपती चौक, वाकड पुणे (मटका चालक-मालक) यांचेविरुध्द वाकड पोलीस स्टेशन येथे गुरनं १३/२०२२ महाराष्ट्र जुगार अधिनियम १८८७ चे कलम ४,५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास वाकड पोलीस स्टेशन करीत आहे.

तसेच दिनांक दिनांक ०५/०१/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे दुसऱ्या पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी चिंचवड पोलीस स्टेशन हद्दीत बिजलीनगर झोपडपट्टी, चिंचवड, पुणे येथील गुरुदेव ॲटोमोबाईल या दुकानाचे समोर मोकळ्या जागेत इसम नामे शंकर मिसाळ हा कल्याण नावाचे जुगारासाठी लोकांकडून पैसे घेवुन त्यांना आकडे लिहुन देवुन स्वतः जुगार खेळत व खेळवित आहे. अशी गुप्तबातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी चिंचवड पोलीस स्टेशन हद्दीत सापळा रचुन १५:०० वा चे सुमारास छापा टाकुन खालील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळुन आला त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) १४,४२०/- रु रोख रक्कम
२) ०५/- रु किं चे कल्याण मटका साहित्य.

---

**असा एकुण १४,४२५/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) शेकप्पा तिकप्पा चलवादी वय ४६ वर्षे रा. बिजलीनगर झोपडपट्टी, चिंचवड, पुणे (रायटर) २) अशोक दत्तात्रय पवार वय ३८ वर्षे रा. भोंडवे वस्ती, रावेत, पुणे (जुगार खेळी) ३) रमेश वामन कसबे वय ४५ वर्षे रा. नागसेन झोपडपट्टी, बिजलीनगर, चिंचवड, पुणे (जुगार खेळी) तसेच पाहिजे आरोपी नामे ४) शंकर मिसाळ पुर्ण नाव पत्ता माहित नाही वय अंदाजे ४५ वर्षे रा. बिजलीनगर, चिंचवड, पुणे यांचेविरुध्द चिंचवड पोलीस स्टेशन येथे गुरनं ०८/२०२२ महाराष्ट्र जुगार अधिनियम १८८७ चे कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यत आला असुन पुढील तपास चिंचवड पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. डॉ. काकासाहेब डोळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर, वपोनि श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभाग व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षातील सपोनि डॉ. अशोक डोंगरे, पोउपनि प्रदिपसिंग सिसोद, पोउपनि धैर्यशिल सोळंके पोलीस अंमलदार विजय कांबळे, किशोर पढेर, संतोष बर्गे, सुनिल शिरसाट, नितीन लोंढे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, सचिन गोनटे, अतुल लोखंडे, वैष्णवी गावडे, सोनाली माने यांनी केली आहे.